॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २४ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागातर्फे शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी पीएच.डी. प्रवेश परीक्षा (PET) पेपर १ साठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. इंगळे यांनी PET परीक्षेतील यशाचे प्रमाण वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, अभ्यासक्रमाची माहिती आणि सरावाची संधी देणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यशाळेत डॉ. संतोष खिराडे यांनी परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम व अध्यापन अभियोग्यता, डॉ. मनीषा इंदाणी यांनी संशोधन अभियोग्यता व तार्किक विचार, डॉ. स्वाती तायडे यांनी पर्यावरणविषयक जागरूकता, तर डॉ. रणजित पारधे यांनी माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान या विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नांचे विश्लेषण, शंकानिरसन आणि ऑनलाइन सराव चाचणीचेही आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेला कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे आणि कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी डॉ. मनीषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे, डॉ. रणजित पारधे, डॉ. स्वाती तायडे, संदीप वाघ, योगेश कोरडेवाड तसेच जयेश पाटील, विवेक भावसार आणि राहुल धुमाळ यांनी सहकार्य केले.

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २४ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता